# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

परीपत्रक

क्रमांकः-तंशिस/विकाना/वृक्षलागवड/2018/535

दिनांक - 5 FEB 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अनुदानित व खाजगी विना अनुदानित
व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर जिल्हा.

विषयः- सन 2018 या वर्षामध्ये एकुण 13 कोटी वृक्ष लागवडीचे यंत्रणानिहाय उद्दीष्ट वाटपाबाबत.

संदर्भः- मा. उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-3/13 कोटी/ 2017-18/5332 दि.20/01/2018

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यांत येते की, नागपूर जिल्हाकरिता सन 2018 या वर्षामध्ये 13 कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट प्राप्त झालेले आहे. वरील संदर्भान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभांगांतर्गत नागपूर जिल्हानिहाय उद्दिष्ठानुसार या जिल्हाअतर्गत येत असलेल्या संस्थांना 5000 वृक्ष लागवड करण्यांचे ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार सन 2018 या वर्षामध्ये वृक्षलागवड कार्यक्रमांत जास्तीत जास्त प्रमाणांत सहभागी होण्यासाठी या विभांगाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या संस्थांनी खालील प्रमाणे संस्थांस्तरांवर पूर्व नियोजन व पूर्वतयारी आणि इतर बाबीसेदर्भांत कार्यवाही करण्यांत यावी जेणे करुन वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य पूर्ण करता येईल.

1. सन 2018 मध्ये दिलेल्या उद्दिष्टयांप्रमाणे प्रत्येक संस्थेत,महाविद्याल्यात 50 वृक्ष लागवड करण्यांचे ठरविण्यांत आलेले आहे. प्रत्येक संस्थेने, संस्थेच्या परीसरात दिलेल्या उद्दिष्टयांप्रमाणे जास्तीत जास्त झाडे लावावी. त्यासाठी माती,खत व किटकनाशके घालून वृक्ष लागवडीपूर्वी किमान 3 महिने आधी दि. 31 मार्च 2018 पर्यंत खड्डे तयार करणे.
2. सर्व संस्था, महाविद्याल्य मध्ये सन 2018 मध्ये वृक्ष लागवड उद्दिष्टपूर्तीसाठी किती क्षेत्र उपलब्ध होईल ते लक्षात घेवुन त्यांचा समावेश लॅण्ड बॅक मध्ये करण्यासाठी आपल्या संस्थेची माहिती दिलेल्या विवरण पत्र 1, 2,व 3 मध्ये भरून या कार्यालयास सादर करावे.
3. संस्था, महाविद्यालयाच्या परीसरात किंवा आजुबाजूला असणा-या मोकळया व पडीक जमिनीचा वापर मोठया प्रमाणात वृक्ष् लागवड करण्यांसाठी करण्यांत यावे.
4. संस्था, महाविद्यालयाच्या स्तरावर वृक्ष लागवडीनंतर रोपांचे जनावरांपासून आणि अन्य बाबीपासून संरक्षण होण्यासांठी योग्य आणि आवश्यक संगोपनासाठी ट्री गार्ड, पाण्यांची उपलब्धता यांची व्यवस्था वृक्षांचे जिवंत राहण्यांचे प्रमाण किमान 80 ते 90 टक्के राखण्यांसाठी उपाय योजना करण्यांत यांवी.
5. महाविद्यालय,संस्थेतील अधिकारी/कर्मचारी/विद्यार्थी यांना शासनांच्या वनविभागांमार्फत निर्माण करण्यांत आलेल्या mahaforest.nic.in **वेबसाईड वर Green Army Registration** करून वृक्ष लागवड कार्यक्रमांत मोठया प्रमाणात सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यांत यावे.

6. महाविद्यालय,संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्यांने किमान 1 झाड दत्तक घेवून त्यांचे संगोपन करण्यांसाठीची योजना तयार करुन आपल्या स्तरांवर विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये वाढीव मार्कच्या स्वरूपात म्हणुन उच्च व तंत्रशिक्षण विभागांकडून धोरण निश्चित करण्यांत येत असल्यांने विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणुन दयावे.
7. महाविद्यालय,संस्थेमध्ये आपत्ती व्यवस्थापनासाठी जसा विद्यार्थ्यांकडुन निधी संकलित केला जातो, त्याच धर्तीवर वृक्ष लागवड आणि संगोपनासाठी संस्था, महाविद्यालय यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडुन प्रत्येकी किमान रू. 2 प्रमाणे दरवर्षी जमा करून विद्यार्थ्यांकडुन एकत्रित उपलब्ध होणारा निधी कायमस्वरूपी वृक्षांच्या संगोपनासाठी वापरण्यांत येईल. अशा योजना/निर्णय आपल्या स्तरावर घेण्यांत यावा.

वरील सर्व बाबी लक्षात घेवुन आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी आणि प्रत्येक संस्थेने वृक्ष लागवड कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभाग घेवून सहकार्य करावे. तसेच दिलेल्या विवरण पत्रात आपल्या संस्थेची माहिती भरून त्वरीत या कार्यालयास पाठवावे. जेणे करून उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर,यांना कालमर्यादेत पाठविणे शक्य होईल.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (का.क्र. 16) यांना माहितीस सविनय सादर.

## Format - I

### Year 2018 - Detail information of 13 cr. Tree plantation (Site wise)

| Sr. No. | Name of Agency/Deptt. | Site Co-ordinator | | Site Co-ordinator | | District | Taluka | City/ Town/ Village | Survey No./Compartment No./ | Latitude | Longitude | GPS Photo | Area (in Ha./ | Total Target Seedlings/ | Name of Species to be planted |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Name | Designation/ Post | Mobile No. | Office No. | | | | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |

## Format - II

### Talukawise Abstract

| Sr. No. | Name of Agency/Deptt. | Taluka Co-ordinator | | | District | Taluka | Total No. of sites | Total area (in Ha/ | Total Seedlings |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Name & | Mobile No. | E-mail | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |

## Format - III

### Distrctwise Abstract

| Sr. No. | Name of Agency/Deptt. | District Head | | | District | Total No. of sites | Total area (in Ha/ KM) | Total Seedlings |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Name & Designatio | Mobile No. | E-mail address | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |